भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-१७/५/२०१८

# प्रेसनोट

## कात्रज जुने घाटात भिलारेवाडी पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याचे तयारीत असलेली टोळी अटकेत

भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दिनांक १६/५/२०१८ रोजी रात्रौ भारती विदयापीठ पोलीस ठाणे हददीत पेट्रोंलीग करीत असणारे तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक श्री शिवदास गायकवाड यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पाच ते सहा इसम हॉटेल हवेली कडे जाणारे कच्या रोडवर अंधारात थांबलेले असुन ते भिलारेवाडी पेट्रोलपंपावर दरोडा टाकणेची तयारी मध्ये आहेत. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी ताबडतोब सदरची माहीती श्री कमलाकर ताकवले सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो व राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे) भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळविली असता त्यांनी तपास पथकातील कर्मचारी यांचेसह ताबडतोब कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने सदर आदेशाप्रमाणे तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक श्री गायकवाड यांनी तपास पथकाचे कर्मचा-यांचे दोन ग्रुप तयार करुन कात्रज जुना घाट हवेली हॉटेलकडे जाणारे कच्च्या रोडवर आजुबाजुला सापळा लावुन रात्रौ २१.५० वा इसम नामे १) अक्षय बाजीराव इंगुळकर वय-२२ रा.अटल नं-४ रुम नं-१३ सच्चाई माता मंदीर आंबेगाव बु पुणे २)विशाल सुरेश सोनवणे वय-२२ वर्षे रा.अटल नं-३ सदगुरू नगर सच्चाईमाता मंदीर आंबेगाव बु पुणे ३)गणेश मारुती पारखे वय-२५ वर्षे रा. पाण्याचे टाकीजवळ सच्चाईमाता मंदीर आंबेगाव बु पुणे यांना ताब्यात घेतलेले असुन त्यांचे ताब्यात एक लोखंडी सत्तुर, एक लोखंडी कोयता, असा कि.रु ९००/-रु चा माल मिळुन आलेला असुन त्यांना अटक केलेली आहे. त्यांचे साथीदार अमित बोराटे रा. आंबेगाव बु पुणे, बापू धनवडे रा.सदर, बाबु पुर्ण नाव पत्ता माहीती नाही हे अंधाराचा फायदा घेवून पळुन गेलेले असुन पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक शिवदास गायकवाड भारती विदयापीठ पोलीस ठाणे हे करीत आहेत.

यातील अटक आरोपी क्रमांक १ ते ३ हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्यांचेवर खुन, खुनाचा प्रयत्न, वाहनचोरी असे गुन्हे दाखल आहेत.

**ही कारवाई मा.श्री डॉ.प्रविण मुंढे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री कमलाकर ताकवले सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री. शिवदास गायकवाड, पो.कर्मचारी प्रदीप गुरव, कृष्णा बढे, विनोद भंडलकर, गणेश सुतार, समीर बागसिराज, बाबासो नरळे, सुमित मोघे यांचे पथकाने केलेली आहे.**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे